सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ४१ | बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

### दिनविशेष
५ नोव्हेंबर

- पुण्यात डेक्कन सभेची स्थापना झाली
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालील संविधान सभेने संविधानाचा मसुदा सादर केला.
- डॉ. श्रीराम लागू आणि सत्यदेव दुबे यांना कला गौरव प्रतिष्ठानतर्फे नाट्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- हिन्दुस्तानी शास्त्रीय संगीतातील असामान्य कामगिरीबद्दल गायक पं. भीमसेन जोशी यांना आदित्य विक्रम बिर्ला कलाशिखर पुरस्कार जाहीर.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

**कृत्तिका नक्षत्र, कार्तिक पौर्णिमेलाच कार्तिक स्वामींचे दर्शन!**

**भगवान विष्णूंना ' नारायण' आणि ' हरी ' का म्हणतात?**

...पान ३ वर

# महाराष्ट्रातील नगर पालिका निवडणुकीचा वाजला बिगूल!

## आचारसंहिता लागू, २ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला होणार मतमोजणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**
**रजनीकांत पाटील**

महाराष्ट्रातील नगर पालिका निवडणुकींचा बिगूल वाजला आहे. राज्य निवडणूक आयोगाने मंगळवार, दि. ४ रोजी दुपारी चारला पत्रकार परिषद घेऊन निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात होईल. २ डिसेंबर रोजी मतदान, तर ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. हा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर राज्यात आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

राज्यातील एकूण २४६ नगर परिषद आणि ४२ नगर पंचायतींसाठी इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिनद्वारे निवडणूक होणार आहे. त्यासाठी ७ नोव्हेंबर रोजी मतदारयादी जाहीर होणार आहे. १० नोव्हेंबर पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होईल. १७ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतीम मुदत राहील. १८ नोव्हेंबर रोजी अर्जांची छाननी होईल. २१ नोव्हेंबर अर्ज माघारीची अंतीम तारीख राहील. २६ नोव्हेंबर रोजी चिन्हांचे वाटप होईल. २ डिसेंबरला मतदान, तर ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. १० डिसेंबरला राजपत्र प्रसिद्ध होईल.

मतदारांना मतदान केंद्र आणि यादीतील नाव शोधण्यासाठी खास ॲप तयार केले जाणार आहे. त्याद्वारे मतदारांना त्यांचे नाव, मतदान केंद्र आणि उमेदवारांविषयीची माहिती मिळविता येईल. उमेदवारांना उमेदवारी अर्ज ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. अर्ज करताना जात वैधता प्रमाणपत्र नसले तरी चालेल. मात्र, निवडुन आल्यानंतर सहा महिन्यांच्या आत ते सादर करणे बंधनकारक राहील. संभाव्य दुबार नावे असतील तर नावापुढे डबल स्टार चिन्हांकित असेल. मतदान इव्हीएम व बॅलेट युनिटवर होईल. राज्यातील एकूण १ कोटी ७ लाख ३० हजार ५७६ मतदार आता मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी सज्ज होणार आहेत. आयोगाने जाहीर केलेल्या तपशीलानुसार या निवडणुकांमध्ये एकूण ६ हजार ८५९ सदस्यांची आणि २८८ अध्यक्षांची निवड केली जाईल. राज्यातील २८८ नगर पालिकांमध्ये १० नव्याने तयार झालेल्या नगर परिषदांचा समावेश आहे. राज्यातील एकूण १४७ नगर पंचायतींपैकी ४२ नगर पंचायतींसाठी निवडणूक होत असून, यात १५ नवनिर्मित नगर पंचायतींचा समावेश आहे. अंतीम मतदार याद्या ३१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झाल्या होत्या. याच याद्यांनुसार मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

## निवडणूक झाली सुरु, बॅनर निघाले भुरु भुरु...!




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आजपासून राज्यभर आचारसंहिता लागू झाल्यानंतर अमळनेर शहरातही प्रशासनाकडून तातडीने कारवाई सुरू करण्यात आली आहे. शहरातील विविध ठिकाणी लावलेले राजकीय पक्षांचे, उमेदवारांचे तसेच शुभेच्छा देणारे बॅनर, फलक आणि पोस्टर हटविण्याची मोहीम नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी हाती घेतली. मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजता शहरात सर्वत्र लावलेले काही बॅनर स्वतः उमेदवारांनी काढून घेतले. उर्वरित बॅनर पालिकेकडून काढण्यात आले. मुख्याधिकारी यांच्या निर्देशानुसार निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. शहरात कुठेही अनधिकृत जाहिराती अथवा बॅनर दिसल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल, अशी माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

# वंदे मातरम गीताच्या १५०व्या वर्धापनदिनी अमळनेरला शुक्रवारी विविध उपक्रम

## तहसीलदारांच्या दालनात बैठक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- वंदे मातरम गीतास ७ नोव्हेंबर २०२५ रोजी दीडशे वर्ष पूर्ण होत आहेत. वर्धापनदिन साजरा करण्यासंदर्भात येथील तहसीलदारांच्या दालनात मंगळवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी बैठक झाली. बैठकीत विविध उपक्रम राबविण्यासंदर्भात चर्चा झाली.

यावेळी राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये वंदे मातरम गीत गायन देशभक्तीपर भाषणे, वकृत्व स्पर्धा, निबंध लेखन यासारखे विविध कार्यक्रम राबवीण्यात येणार आहेत. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर बैठकीत अमळनेर तालुक्यात विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे दहा वाजता साने गुरुजी शाळेत पाच हजार विद्यार्थी-विद्यार्थीनी समूहाने वंदे मातरम गीत सादर करतील. या बैठकीस तहसीलदार रुपेशकुमार सुराणा अध्यक्षस्थानी होते. गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, संदीप घोरपडे, मेघराज महाजन, अहिराणी साहित्यिक कृष्णा पाटील, बाबूलाल पाटील, आशिष चौधरी, दत्तात्रय सोनवणे, पंकज भावसार, चंद्रकांत मुसळे, बापू संदानशिव, दिलीप भावसार, विलास बोरसे, प्रभारी प्राचार्य विजय वाणी, अनिल दुसाने, डी. एस. पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी केले आहे.

### लागली रे भो एकदाची निवडणूक...!

## इच्छुक उमेदवारांनी सोडला सुटकेचा श्वास...!!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिर्घकाळापासून नगरसेवक होण्याचे स्वप्न पाहणारे इच्छूक उमेदवार मतदारांचे लाड पुरवता पुरवता पार थकले आहेत. सर्वांचे सुख - दुःख - मरण - धरण - वाढदिवस - आजारपण - सण - उत्सव आदिंसाठी पैसा खर्च करून उमेदवार अक्षरशः धायकुतीला आले आहेत. शिवाय कार्यकर्त्यांचे रूसवे-फुगवे निस्तारण्यासाठी तसेच विश्वासू कार्यकर्त्यांना टिकऊन ठेवण्यासाठी सर्वांना नियमित पणे येथील हॉटेल, ढाबे, परमिट रूम येथे रंगीत-संगीत बैठका घ्याव्याच लागत होत्या. काहीजण तर अमळनेरला 'बसणे' योग्य नाही. बाहेर गावी बसू असे सांगून धुळे-जळगावच्या मोठ्या हॉटेलमध्ये पार्ट्या घेत होते. या सर्व खर्चाला कंटाळून केव्हा एखदा निवडणूक लागेल याची इच्छूक उमेदवार वाट पाहत होते. निवडणुक लागल्याने त्यांनी लागली रे भो एकदाची निवडणूक असे म्हणत सुटकेचा श्वास सोडला आहे.




# जळगावहून विमानांचे उड्डाण सकाळीच व्हावे....!

## प्रवाशांची मागणी; फ्लाय ९१ कंपनीचे विमान प्राधिकरणाला पत्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



गेल्या दोन वर्षांपासून फ्लाय ९१ ही कंपनी जळगावहून गोवा, पुणे आणि हैदराबाद या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा पुरवत आहे. मात्र, या सर्व विमानांचे वेळापत्रक मुख्यतः दुपारनंतर किंवा सायंकाळच्या सुमारास ठेवण्यात आले आहे. ही विमानसेवा सकाळी सुरु करावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

शहरातील वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर आणि व्यावसायिक पर्यटनाच्या मागणीचा विचार करता, फ्लाय ९१ या कंपनीने जळगाव विमानतळावरील सकाळच्या वेळा पुणे आणि गोव्याच्या विमानसेवा सुरू करण्यासाठी मागितल्या आहेत. त्यांसदर्भात कंपनीकडून पत्र व्यवहार विमान प्राधिकरणाकडे करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. गेल्या दोन वर्षांपासून ही कंपनी जळगावहून गोवा, पुणे आणि हैदराबाद या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा पुरवत आहे. मात्र, या सर्व विमानांचे वेळापत्रक मुख्यतः दुपारनंतर किंवा सायंकाळच्या सुमारास ठेवण्यात आले आहे. त्यामुळे प्रवाशांना दिवसाच्या सुरुवातीला कामकाजासाठी किंवा कनेक्टिंग फ्लाईसाठी वेळेत पोहोचण्यात अडचणी येतात.

फ्लाय ९१ चे राष्ट्रीय महसूल प्रमुख आशुतोष चिटणीस यांनी सांगितल्यानुसार, कंपनीकडून फ्लाईटसाठी सकाळच्या वेळा उपलब्ध करून देण्याबाबत विमान प्राधिकरणाच्या वरिष्ठ कार्यालयाकडे औपचारिक विनंती करण्यात आली आहे. त्यानुसार, गोवा आणि पुण्यासाठी सकाळच्या फ्लाईट सुरू झाल्यास प्रवाशांना पुणे, गोवा, हैदराबाद यांसारख्या शहरांतील कामे एका दिवसात पूर्ण करून परतण्याची संधी मिळेल. तसेच जळगावला अन्य नव्या रुटवरील कनेक्टिंग फ्लाईट्सशी जोडणी साधणे सुलभ होईल. दरम्यान, जळगाव विमानतळाचे संचालक हर्ष त्रिपाठी यांनी दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, पुणे आणि गोव्यासाठी सकाळच्या फ्लाईट्स सुरू करण्या संदर्भात अद्याप स्थानिक पातळीवर वरिष्ठ कार्यालयाकडून कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही. सध्या जळगाव विमानतळावर एकाच शिफ्टमध्ये कामकाज चालते. आणि बहुतांश फ्लाईट्स दुपारी किंवा सायंकाळीच सुटतात. विमानतळावरून सकाळच्या फ्लाईट्स सुरू झाल्यास व्यावसायिकांना पुणे, गोवा

पान ३ वर

# भारतीय रेल्वेने बदलले सीट बुकिंगचे नियम!

## लोअर बर्थ कोणाला मिळणार? झोपण्याच्या, बसण्याच्या वेळाही निश्चित!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



तत्काळ तिकीट बुकिंग आणि आरक्षणाचे नियम बदलल्यानंतर भारतीय रेल्वेने आता ट्रेनच्या बसण्याच्या पद्धतीबाबत नवीन नियम काढले आहेत. लांब पल्ल्याच्या रेल्वे प्रवासादरम्यान बहुतेक लोकांना खालच्या बर्थची बुकिंग हवी असते. ट्रेनच्या प्रत्येक कोचमध्ये तीन बर्थ असतात. तिकीटे बुक करताना अनेक जण त्यातही प्रामुख्याने महिला आणि वृद्ध खालच्या बर्थची बुकिंग मिळवण्याचा प्रयत्न करतात. आता भारतीय रेल्वेने या खालच्या बर्थच्या बुकिंगबाबत एक महत्त्वाचा बदल केला आहे. रेल्वेने केलेले हे बदल समजून घेणे महत्त्वाचे आहे.

आसनांसाठी विशेष नियम रेल्वेने आगाऊ आरक्षणाचा कालावधी १२० दिवसांवरून ६० दिवसांपर्यंत कमी केला. तिकीट बुकिंग करताना लोअर बर्थ प्रिफरन्स पर्याय निवडल्यानंतरही लोकांना लोअर बर्थ मिळत नाही. रेल्वेच्या नियमांनुसार, ४५ वर्षांवरील महिला, गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिकांना लोअर बर्थ दिला जातो. असे असतानाही हे जागांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. तिकीट बुक करताना तुम्ही लोअर बर्थ सीटचा पर्याय निवडला तरीही ती उपलब्ध नसेल तर तुम्हाला मधली, वरची किंवा बाजूची सीट मिळेल. आता रेल्वेने यामध्ये एक मोठा बदल केला आहे. रेल्वेने तिकीट बुकिंग करताना लोअर बर्थ उपलब्ध असेल तरच बुक करा हा पर्याय सुरू केला आहे. आयआरसीटीसी वरून तिकीट बुक करताना लोअर बर्थ उपलब्ध असेल तरच बुक करा हा पर्याय दिला जातो. याअंतर्गत ट्रेनमध्ये खालचा बर्थ उपलब्ध असेल तरच तुमचे तिकीट बुक केले जाईल. ट्रेनमध्ये झोपण्याचे नियम रेल्वेने गाड्यांमध्ये झोपण्यासाठी नियमदेखील निश्चित केले आहेत. तुम्ही रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत तुमच्या सीटवर झोपू शकता. या काळात प्रवासी त्यांच्या नियुक्त सीटवर झोपू शकतात. इतर वेळी तुम्हाला तुमची सीट उघडण्याची परवानगी दिली जाणार नाही, त्यातही प्रामुख्याने मधला बर्थ. दिवसाच्या उर्वरित काळात प्रवाशांना बसण्याची परवानगी असेल.

# मसाला पान



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतात चलनाचा (करन्सी) इतिहास २५०० वर्षे जुना आहे. याची सुरूवात एका राजाने केली होती. जर इंग्रजांना शक्य झाले असते, तर आज भारताचे चलन पौंड असते. परंतु रुपया मजबूत असल्यामुळे तसे होऊ शकले नाही. गोष्ट सन १९१७ मधील आहे. जेव्हा रुपया १३ अमेरिकन डॉलरच्या बरोबर होता. मग १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला आणि १ रुपया = १$ करण्यात आले. पुढे हळूहळू भारतावर कर्ज वाढत गेले तेव्हा इंदिरा गांधींनी कर्ज चुकते करण्यासाठी रुपयाची किंमत अर्धी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आजपर्यंत रुपयाची किंमत घसरतच आली आहे. स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानने तोपर्यंत भारतीय चलन वापरले. तोपर्यंत त्यांनी स्वतःच्या चालू शकणाऱ्या नोटा छापल्या नाहीत. भारताव्यतिरिक्त इंडोनेशिया, मॉरिशस, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका यांची देखील करन्सी रुपया आहे.

### नोटांवरील चित्र

प्रत्येक भारतीय नोटेवर कोणत्या ना कोणत्या गोष्टीचा फोटो छापलेला असतो. जसे २० रुपयांच्या नोटेवर अंदमान बेटाचा फोटो आहे, तर १० रुपयांच्या नोटेवर हत्ती, गेंडा आणि सिंह छापलेला आहे. १०० रुपयांच्या नोटेवर डोंगर आणि ढगांचे चित्र आहे. याशिवाय ५०० रुपयांच्या नोटेवर स्वातंत्र्याच्या आंदोलनाशी निगडीत ११ मूर्तींचा फोटो छापलेला आहे. भारतीय नोटेवर तिची किंमत १५ भाषांमध्ये लिहिली जाते. भारतीय नोटेवर महात्मा गांधींचा जो फोटो छापलेला असतो तो तेव्हा काढण्यात आलेला होता. जेव्हा गांधी, तत्कालीन बर्मा आणि भारतात ब्रिटीश सेक्रेटरीच्या रूपात कार्यरत असलेल्या फ्रेडरिक लॉरेन्स याला कोलकत्तास्थित व्हाईसराय हाऊसमध्ये भेटायला गेले होते. १९९६ मध्ये हा फोटो नोटांवर छापण्यास सुरूवात झाली. त्यापूर्वी नोटेवर अशोक स्तंभ छापला जात असे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जानेवारी १९३८ मध्ये पहिल्यांदा ५ रुपयांची पेपर करन्सी छापली होती. ज्यावर किंग जॉर्ज – ६ चा फोटो होता.

### सीरियल नंबर

नोटांवर सीरियल नंबर अशासाठी टाकलेला असतो जेणेकरून रिझर्व्ह बँकेला समजू शकेल, की या क्षणी मार्केटमध्ये किती चलन आहे. सुरक्षा कारणांसाठी नोटांच्या सीरियल नंबरमध्ये आय, जे, ओ, एक्स, वाय, झेड ही अक्षरे नसतात.




रुपया

### नोटांचे मटेरिअल

भारतीय नोट सामान्य कागदाच्या नव्हे; तर कॉटनपासून बनलेल्या असतात. त्या इतक्या मजबूत असतात, की नोट नवीन असेल तर तुम्ही तिच्या दोन्ही कडा पकडून ती नोट फाडू शकत नाही. जर तुमच्याकडे अर्ध्याहून अधिक (५१%) फाटलेली नोट असेल तरी तुम्ही बँकेत जाऊन ती बदलून आणू शकता.

### ५०० आणि १००० च्या नोटा

भारताच्या ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा नेपाळमध्ये चालत नाहीत. आता तर त्या भारतातही चालत नाहीत. ५०० रुपयांची पहिली नोट १९८७ मध्ये आणि १००० रुपयांची पहिली नोट २००० मध्ये बनविण्यात आली होती. सध्या त्या दोन्ही नोटा बंद झाल्या. १०००, ५०० रुपयांच्या नव्या नोटा बाजारात आल्या. परंतु मोदी सरकारने त्या देखील बंद केल्या व नवीन ५०० व २००० च्या नोटा चलनात आणल्या.

### किती नोटा छापू शकते आरबीआय?

ॲकॉर्डिंग टू आरबीआय, भारत दरवर्षी २००० करोड करन्सी नोटा छापतो. आरबीआय स्वतःला हव्या तेवढ्या नोटा छापू शकते? नाही, तसे नाहीये. आरबीआय स्वतःला वाटेल तेवढ्या नोटा छापू शकत नाही, तर ती फक्त १० हजारांपर्यंतच्या नोटा छापू शकते. जर याहून अधिक नोटा छापायच्या असतील तर तिला रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्ट १९३४ मध्ये बदल करावा लागेल. जर आपल्याकडे मशीन आहेत तर आपण अगणित नोटा का छापू शकत नाही? आपण किती नोटा छापायच्या हे मुद्रा स्फिती, जीडीपी ग्रोथ, बँक नोट्सची रिप्लेसमेंट आणि रिझर्व्ह बँकेचा स्टॉक यांच्यावर निर्धारित होते. आजच्या घडीला भारतात अनेक प्रकारच्या बनावट नोटा आहेत. परंतु प्रशासनाचे याकडे बारकाईने लक्ष आहे. आशा आहे की ही परिस्थिती सुधारेल.

एके काळी भ्रष्टाचाराशी लढण्यासाठी ० ची नोट फिफ्थ पिलर नावाच्या बिगर सरकारी संस्थेकडून चलनात आणलेली होती. १९३८ यावर्षी १० हजारांची नोट देखील छापली गेली. परंतु १९७८ मध्ये त्या पूर्णपणे बंद करण्यात आल्या.

### छपाईला किती खर्च येतो?

एका नोटेच्या छपाईला किती खर्च येतो पाहूया.

**१ रुपया = १.१४ रुपये**
**१० रुपये = ०.६६ रुपये**
**२० रुपये = ०.९४ रुपये**
**५० रुपये = १.६३ रुपये**
**१०० रुपये = १.२० रुपये**
**५०० रुपये = २.४५ रुपये**
**१००० रुपये = २.६७ रुपये**
**२००० रुपये = अजूनपर्यंत** माहिती मिळालेली नाही.
ही माहिती जुन्या चलनाची आहे. नवीन चलनात भरपूर बदल झालेले आहेत.

### नाणी

१ रुपयात १०० पैसे असतील, ही गोष्ट १९५७ मध्ये लागू करण्यात आली होती. त्या आधी रुपया १६ आण्यांमध्ये विभागला जायचा. स्वातंत्र्यानंतर तांब्याची नाणी बनत असत. त्यानंतर १९६४ मध्ये ॲल्युमिनियमची आणि १९८८ मध्ये स्टेनलेस स्टीलची नाणी बनायला सुरूवात झाली.

### ५ च्या नाण्यापासून ब्लेड?

एकवेळ अशी होती, की जेव्हा बांगलादेश ब्लेड बनविण्यासाठी भारताकडून ५ रुपयांची नाणी मागवत असे. ५ रुपयांच्या एका नाण्यापासून ६ ब्लेड बनत असत. एका ब्लेडची किंमत २ रुपये होती. त्यामुळे ब्लेड बनविणाऱ्याचा चांगला फायदा होत होता. हे पाहून भारत सरकारने नाणे बनविण्याचा धातूच बदलून टाकला. १० रुपयांचे नाणे बनविण्यासाठी ६.१० रुपये खर्च येतो.

### नाण्यावर खास खूण

प्रत्येक नाण्यावर वर्षाच्या खाली एक खास खूण बनलेली असते, ते निशाण पाहून समजू शकते, की हे नाणे कुठे बनलेले आहे.
**मुंबई हीरा**
**नोएडा डॉट**
**हैदराबाद तारा**
कोलकता कोणतीही खूण नाही.

### कमी खर्चात करा या देशांची सफर

डॉलरच्या तुलनेत रुपया नक्कीच कमजोर आहे. परंतु तरीही काही देश असे आहेत, की ज्यांच्या चलनापुढे रुपया खूप मोठा आहे. तुम्ही कमी खर्चात या देशांची सफर करण्याचा आनंद लुटू शकता.

### १ रुपया

नेपाळ = १.६० नेपाळी रुपये.
आइसलँड = १.९४ क्रोन.
श्रीलंका = २.१० श्रीलंकन रुपये.
हंगरी = ४.२७ फोरिंट रुपये.
कंबोडिया = ६२.३४ रियाल रुपये.
पेराग्व = ८४.७३ गुआरनी रुपये.
इंडोनेशिया = २२२.५८ इंडोनेशियन रुपये.
बेलारूस = २६७.९७ बेलारूसी रुबल रुपये.
व्हिएतनाम = ३४०.३९ व्हिएतनामी डॉन्ग रुपये.

# विनोद कांबळीसोबत असे काय घडले की तो आज या स्थितीत आहे?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

माजी भारतीय क्रिकेटपटू विनोद कांबळी यांची प्रकृती पुन्हा चर्चेत आली आहे. नुकत्याच मुंबईत झालेल्या त्यांच्या प्रशिक्षक रमाकांत आचरेकर यांच्या स्मारकाच्या उद्घाटन सोहळ्यात कांबळी उपस्थित होते. या कार्यक्रमाला सचिन तेंडुलकरही हजर होते. या दोघांनी दिलेला भावनिक क्षण चाहत्यांच्या मनात भरला. मात्र, या आनंदाच्या प्रसंगानंतर कांबळी यांची प्रकृती आणि त्यांची कमकुवत दिसणारी शारीरिक अवस्था यावर चर्चा सुरू झाली.




### मन:स्वास्थ्य अन् इतर आव्हाने

केवळ शारीरिक आरोग्यच नव्हे, तर मानसिक आरोग्यासोबतच्या संघर्षांबद्दलही कांबळी यांनी उघडपणे चर्चा केली आहे. नैराश्याशी लढा देतानाच त्यांच्या मद्यपानाच्या सवयींमुळे त्यांची प्रकृती अधिक खालावत गेली आहे.

### ताज्या समस्या आणि चाहत्यांची चिंता

यावर्षी सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाला होता. ज्यामध्ये कांबळी चालताना अडचणीत असल्याचे दिसत होते. हा व्हिडिओ पाहून चाहत्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली. मात्र, कांबळी यांनी लगेचच सोशल मीडियावर स्पष्ट केले, की ते सध्या ठीक आहेत. असे असले तरी त्यांच्या प्रकृतीबद्दलची चर्चा थांबलेली नाही.

### कांबळींचा आरोग्य प्रवास : एक झुंज

विनोद कांबळी यांनी क्रिकेटमधील आपल्या कारकीर्दीमध्ये जितकी उंची गाठली तितकीच उताराच्या काळात आरोग्यासाठी झुंज दिली आहे. २०१० च्या सुमारास त्यांची प्रकृती खालावली होती. २०१३ मध्ये हृदयविकाराचा झटका आल्यानंतर त्यांच्या दोन ब्लॉक झालेल्या धमन्यांवर ॲन्जिओप्लास्टी करण्यात आली. जरी या उपचारांनंतर त्यांनी काही काळासाठी सुधारणा केली होती, तरी त्यांच्या प्रकृतीबाबतची चिंता कायम राहिली आहे.

### काही उजळलेल्या आठवणी

आचरेकर यांच्या स्मारकाच्या उद्घाटन सोहळ्यात सचिन तेंडुलकर आणि कांबळी यांचा तो भावूक क्षण अनेक जुन्या आठवणी जाग्या करणारा ठरला. कधी मैदानावरच्या दोस्तीमुळे गाजलेले हे दोन साथीदार आता एका वेगळ्या टप्प्यावर आले आहेत. जेथे सचिन यशस्वी जीवन जगत आहेत, तर कांबळी आरोग्याच्या लढाईत अडकल्याचे दिसत आहेत. विनोद कांबळी यांची आरोग्यासोबतची झुंज ही त्यांच्या चाहत्यांसाठी नेहमीच चिंता आणि चर्चेचा विषय राहिली आहे. हृदयविकार, मानसिक संघर्ष, आणि शारीरिक आरोग्याशी संबंधित आव्हाने यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला आहे. त्यांच्या सध्याच्या प्रकृतीबाबत लोकांची काळजी समजण्यासारखी आहे. मात्र कांबळी यांचे सकारात्मक संदेश आणि लढाऊ वृत्ती त्यांना पुढे नेईल, अशी आशा करायला हरकत नाही.

# इलेक्ट्रिक ट्रॅक्टर बाजारात: एकदा चार्ज केलं की ५ तास चालणार, डिझेलपेक्षा ६४% स्वस्त!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

डिझेल ट्रॅक्टरला टक्कर देण्यासाठी पर्यावरणस्नेही इलेक्ट्रिक ट्रॅक्टर बाजारात दाखल झाला आहे. सीएसआयआर (वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद) च्या संशोधकांनी विकसित केलेला हा ट्रॅक्टर शेतीत क्रांती आणणार आहे. कमी खर्च, सुलभ वापर आणि महिला शेतकऱ्यांसाठी सोयीस्कर असलेला हा ट्रॅक्टर डिझेलच्या तुलनेत ६४% स्वस्त आहे. चला, या ट्रॅक्टरची वैशिष्ट्ये आणि फायदे जाणून घेऊया.

**५ तास काम, फक्त २०० रुपयांत**

सीएसआयआर चे मुख्य संशोधक डॉ. प्रदीप राजन यांनी सांगितले की, हा इलेक्ट्रिक ट्रॅक्टर शेतीसाठी अत्यंत उपयुक्त आहे. पुरुष आणि महिला दोघेही तो सहज चालवू शकतात. डिझेल ट्रॅक्टरच्या तुलनेत यात थकवा जाणवत नाही आणि मेंटेनन्स खर्चही कमी आहे.

**चार्जिंग :** ४ तासांत फुल चार्ज.
कामाचा कालावधी : ४–५ तास शेतीचे काम किंवा ६ तास वाहतूक.
**खर्च :** ५ तासांसाठी १८–२० युनिट वीज (अंदाजे २०० रुपये).
**बचत :** डिझेल ट्रॅक्टरला तासाला १.५ लिटर डिझेल लागते (अंदाजे १२० रुपये/तास), तर इलेक्ट्रिक ट्रॅक्टर ६४% स्वस्त आहे.

**२६ एचपी ची ताकद, ५ वर्षांची बॅटरी गॅरंटी**

**ताकद :** २६ हॉर्सपावर म्हणजेच ५२ बैलांच्या ताकदीइतका सामर्थ्यशाली.
**उपकरणे :** नांगर, रोटाव्हेटर यांसारखी सर्व उपकरणे सहज लावता येतात.
**बॅटरी :** ५ वर्षांची गॅरंटी, १०,००० चार्ज–डिस्चार्ज सायकल.
**वाहतूक :** ६ तास सामान वाहतूक करण्याची क्षमता.

**विकास आणि किंमत**

हा ट्रॅक्टर विकसित करण्याची योजना २०२० मध्ये सुरू झाली. डिसेंबर २०२३ मध्ये मॉडेल पूर्ण झाले.
**उत्पादन खर्च :** ८.५लाख रुपये.
**सबसिडी :** केंद्र सरकारला सबसिडी प्रस्ताव पाठविला आहे. मंजूर झाल्यास शेतकऱ्यांना ४–४.५ लाख रुपयांत उपलब्ध होईल, असे सीएसआयआरचे प्रिन्सिपल संशोधक अविनाश कुमार यादव यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांसाठी वरदान**

**पर्यावरणस्नेही :** डिझेलच्या तुलनेत प्रदूषणमुक्त.
**महिलांसाठी सोयीस्कर :** हलके आणि सुलभ ऑपरेशन.
**कमी खर्च :** मेंटेनन्स आणि ऑपरेशनल खर्च कमी.
**वाहतूक :** शेतीसह मालवाहतुकीसाठी उपयुक्त.

**शेतीत क्रांतीची सुरूवात**

डिझेलच्या वाढत्या किमती आणि मेंटेनन्सच्या खर्चातून शेतकऱ्यांना दिलासा देणारा हा ट्रॅक्टर शेतीला किफायतशीर आणि टिकाऊ बनवेल. येत्या काही महिन्यांत हा ट्रॅक्टर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल. ज्यामुळे आधुनिक शेतीला नवी दिशा मिळेल.

# आकाशात वेगवान उडणारा पक्षी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

गरुड हा एक शक्तिशाली आणि वेगवान शिकारी पक्षी आहे. जो जगभरात विविध प्रजातींमध्ये आढळतो. गरुडाची दृष्टी अत्यंत तीक्ष्ण असते. तो आपल्या शिकारला एक ते दोन किलोमीटरवरून ओळखू शकतो. काही क्षणांतच तो आकाशाच्या उंचीवरून शिकारवर हल्ला करतो. गरुडाचे उड्डाण आणि दृष्टी दोन्हीही प्रभावी असतात. तो जगातील बहुतांश खंडांवर (अंटार्क्टिकाबाहेरील) आढळतो. गरुड गिधाडाप्रमाणे मृत प्राणी खात नाही; तो जीवंत शिकार करतो. गरुडाचे पंख पातळ आणि लवचिक असतात. ज्यामुळे तो वेगाने उडू शकतो आणि सहज दिशा बदलू शकतो. त्याचे पंजे आणि नखे मजबूत असल्याने शिकार पकडणे सोपे होते.
हा आश्चर्यकारक पक्षी आकाशात दहा हजार फूट उंचीवर उडू शकतो. मादी गरुड एकावेळी एक ते तीन अंडी घालते. माता गरुड ३४ ते ३६ दिवस अंड्यांवर बसून त्यांना उबवते. त्यानंतर पिलू बाहेर येतात. गरुडाचा सरासरी उड्डाण वेग प्रतितास ४० ते ५० कि.मी. असतो, तर शिकार करताना डाव्हिंगमध्ये १६० कि.मी. प्रतितासपर्यंत वेग मिळवू शकतो (सुवर्ण गरुडासारख्या प्रजातींमध्ये). केवळ आकाशातच नव्हे, तर जमिनीवरही तो वेगाने हालचाल करू शकतो.
गरुड जंगली स्थितीत २० ते ३० वर्षे जगतो, तर बंध्यावस्थेत ५० वर्षांपर्यंत. वयाच्या ४० व्या वर्षी त्याचे पंख किंवा पंजे कमकुवत होतात असे नाही. उलट गरुड दरवर्षी नैसर्गिकरित्या पिसे बदलतो. लोकप्रिय कथा सांगते, की गरुड ४० वर्षांच्या वयात स्वतःला ' नूतनीकरण ' करतो. चोच, पंजे आणि पिसे तोडून नवीन वाढवतो. परंतु ही एक दंतकथा आहे. वास्तवात गरुडाचे पिसे हळूहळू बदलतात. चोच व पंजे आयुष्यभर वाढत राहतात. ही कथा धैर्य आणि पुनरागमनाचे प्रतीक म्हणून प्रेरणादायी आहे. मात्र वैज्ञानिकदृष्ट्या खरी नाही.



### गरुडाचे स्थान अन् शिकार

गरुड उंच झाडांवर, डोंगर आणि खडकांवर घरटे बनवतो. तो शिकारीसाठी उंच ठिकाणे निवडतो. गरुड मांसाहारी असून साप, उंदीर, बेडूक, मासे, लहान पक्षी आणि बड्या प्राण्यांना खातो.

### गरुडाचे महत्त्व

गरुड धैर्य, सामर्थ्य आणि स्वातंत्र्याचे प्रतीक मानला जातो. त्याचे मजबूत स्नायू, लांब पंख आणि हवेत उडण्याची क्षमता यामुळे त्याला ' उड्डाण यंत्र ' म्हणतात. प्राचीन काळापासून गरुड विविध संस्कृतींमध्ये पवित्र मानला जातो. दुसऱ्या महायुद्धात कबूतर संदेश रोखण्यासाठी बाजूकड्या वापरल्या गेल्या, गरुड नव्हे. गरुडाची दृष्टी माणसापेक्षा ४ ते ८ पट अधिक तीक्ष्ण असते.

## सक्सेस स्टोरी

# आयएएस अक्षय पटेल ने दूसरे अटेम्प्ट में कैसे क्लियर किया यूपीएससी?

आयएएस अक्षय पटेल ने यूपीएससी परीक्षा दूसरे प्रयास में कैसे पास की, इसकी कहानी प्रेरणादायक है। वह उत्तर प्रदेश के फतेहपुर जिले के बसंतीखेड़ा गांव के रहने वाले हैं। अक्षय का बचपन से ही आयएएस बनने का सपना था।
उन्होंने दिल्ली विश्वविद्यालय के रामानुजन कॉलेज से मैथ्स ऑनर्स की डिग्री ली और कॉलेज के दिनों से ही यूपीएससी की तैयारी शुरू कर दी थी।
उन्होंने पहली बार २०२३ में यूपीएससी परीक्षा दी, जहां वे मेंस तक पहुंचे पर चयन नहीं हो सका। इनमें असफलता से हार न मानते हुए उन्होंने और कड़ी मेहनत की और २०२४ में दूसरे प्रयास में परीक्षा उत्तीर्ण कर आइएएस अधिकारी बन गए। अक्षय का मानना है कि सफलता के लिए लक्ष्य पर पूरी तरह फोकस होना चाहिए। वे रोजाना ८ से १० घंटे पढ़ाई करते थे और अनुशासन को अपनी सबसे बड़ी ताकत माना। अक्षय की सफलता के पीछे उनके परिवार का समर्थन भी मुख्य कारण है, जिसमें उनके माता–पिता, बड़े भाई (जो भारतीय वायुसेना में हैं) और बहन शामिल हैं। उन्होंने सबको प्रेरित किया कि यूपीएससी जैसी कठिन परीक्षा में निरंतर मेहनत और धैर्य से सफलता हासिल की जा सकती है।
संक्षेप में, अक्षय पटेल की यूपीएससी सफलता का राज था निरंतर मेहनत, मनोबल बनाए रखना, परिवार का सहयोग, और लक्ष्य पर केंद्रित रहना। उनके दूसरे प्रयास में सफल होने की कहानी अन्य उम्मीदवारों के लिए प्रेरणा स्रोत है.

### अक्षय पटेल की तैयारी रणनीति और रोज़ाना रूटीन

आयएएस अक्षय पटेल की तैंयारी रणनीति और रोज़ाना रूटीन का आधार अनुशासन, फोकस और संतुलित अध्ययन था। वे सुबह लगभग ५ बजे उठते थे, हल्का व्यायाम और योग करते थे जिसके बाद नहा–धोकर स्वस्थ नाश्ता करते थे। सुबह से लेकर शाम तक अध्ययन के लिए निर्धारित सत्र रखते और प्रमुख विषयों को प्राथमिकता देते थे।
वे नियमित रूप से पिछले वर्ष के प्रश्नपत्र हल करते और मॉक टेस्ट देते थे, जिससे परीक्षा का पैटर्न समझा और समय प्रबंधन में मदद मिली। परिवार का समर्थन भी उनके लिए महत्वपूर्ण था, जो मानसिक मजबूती प्रदान करता था। उनकी रणनीति में स्वयं के स्वास्थ्य का ध्यान रखना और ब्रेक लेकर पढ़ाई करना भी शामिल था, जिससे वे लम्बे समय तक फोकस्ड रह सके। इस व्यवस्थित और समर्पित दिनचर्या के कारण ही अक्षय पटेल ने अपने दूसरे प्रयास में यूपीएससी परीक्षा सफलतापूर्वक क्लियर की.

**उनका दैनिक रूटीन कुछ इस प्रकार था :**
- सुबह ५ बजे उठना और व्यायाम/योग १ घंटा
- ६ से ७ बजे तक नहाना और नाश्ता
- ७ बजे से १० बजे तक मुख्य विषयों का अध्ययन (जैसे इतिहास, भूगोल, राजनीति)
- १०.३० से १ बजे तक दूसरा अध्ययन सत्र (दूसरे महत्वपूर्ण विषय)
- दोपहर २ से ४ बजे तक वैकल्पिक विषय की तैयारी
- ४.३० से ७ बजे तक घटनाक्रम और नोट्स बनाना
- शाम ८ से १० बजे तक संशोधन और सीएसएटी की तैयारी



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com

# कृत्तिका नक्षत्र, कार्तिक पौर्णिमेलाच कार्तिक स्वामींचे दर्शन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विश्वामध्ये अनेक धर्म आहेत. प्रत्येक धर्मामध्ये निरनिराळ्या रूढी, प्रथा, परंपरा आहेत, मान्यता आहेत. कधी-कधी त्या मान्यतांना आधार असतो. तर कधी-कधी त्या मान्यतांना कुठलाही आधार नसतो. ती जीवाच्या मनाची कल्पना असू शकते. मान्यता असो नाही तर रूढी परंपरा असो. सर्वच्या सर्व गोष्टी या बाह्य प्रगती, भौतिक प्रगती आणि लौकिक प्रगतीसाठीच वापरल्या जातात. त्यापैकीच आपल्याकडे एक असलेली मान्यता म्हणजे कार्तिक महिन्यात कार्तिक पौर्णिमेस कृत्तिका नक्षत्र असताना कार्तिक स्वामींचे दर्शन घेणे. त्यात अशी मान्यता आहे, की हे दर्शन घेण्याने तुमची आर्थिक प्रगती होते, भौतिक प्रगती होते आणि ज्ञानातही वाढ होऊन प्रगती होते.
या दर्शनाचे विरुद्ध असण्यात किंवा विशिष्ट दिवशी दर्शन घेण्याच्याही विरोधात असण्याचे कारण नाही. पण मूलभूत भाग असा आहे, की केवळ वर्षभरातून एकदा त्या नक्षत्री आणि त्या तिथीला दर्शन घेण्याने खरोखरच हे घडते का? याने माणूस मान्यतेत अडकून अजून अंधश्रद्ध होतो? की हे दर्शन नेमके तुम्हाला एखादी गोष्ट जाणण्यासाठी ठेवलेला एक विधी आहे?
श्री स्वामी समर्थ यांच्या बखरीमध्येही श्री स्वामी समर्थ अनेक वेळा वेद, उपनिषद आणि पुराणांमधील काही वाक्य मुखाने म्हणत असत. त्यामध्ये सुद्धा या विषयासंदर्भात दिलेल्या श्लोकाचा आधार घेऊन सांगितले जाते की, समर्थांनी सुद्धा कृत्तिका नक्षत्री कार्तिक स्वामींचे दर्शन घेण्यास लोकांना सांगितले आहे. ते दर्शन घेण्याने मनुष्य धनाढ्य होतो आणि वेद पारंगत होतो. तो श्लोक खाली देत आहे. पण खरोखरच त्या श्लोकाचा इतका स्थूल अर्थ आहे का?
कार्तिकेय कृत्तिका योगे यः कुर्यात् स्वामीदर्शनम् |
सप्तजन्म भवेद्विप्रो धनाढ्यो वेदपारगः ||
यासाठी कार्तिक स्वामींच्या जन्माची जर कथा पाहिली, तर मग ते लक्षात येऊ शकते. तारकासुर या राक्षसाचा वध करण्यासाठी सर्व देवांच्या आणि ऋषींच्या विनंतीवरून स्थूल देहाने प्रकट झालेले शिवाचे तेज म्हणजे कर्तिक स्वामी.
संपूर्ण ब्रह्मांडाच्या, प्रकृतीच्या मुळाशीच या भगवान शिव यांचे तेज आहे. त्या तेजाचा एक प्रतिनिधी म्हणून कार्तिक स्वामींकडे पाहिले तरी चालू शकते. भगवान शिव ही संकल्पना जाणून घेतली, की मग शिवाचे तेज म्हणजे काय...? हेही जाणून घेणे सोपे जाते. भगवान शिव या मूळ संकल्पनेला देहरूपाने अशाप्रकारे सादर केले आहे, की समुद्रमंथनावेळी निर्माण झालेले विष केवळ आणि केवळ भगवान शिव यांनी धारण केले. त्यांच्याशिवाय कुठल्याच देवतेमध्ये अगदी ब्रह्मा आणि विष्णू यांच्यातही ते विष धारण करण्याची ताकद नव्हती. संपूर्ण ब्रह्मांडाचा नाश करणारे विष धारण करण्याची ताकद ज्या भगवान शिव यांच्यामध्ये आहे त्यांचे तेज, त्यांची ताकद, त्यांची शक्ती ही किती पटीने असू शकेल? याची आपण मानव म्हणून कल्पनाही करू शकत नाही.
अग्नीला केवळ अग्नीच धारण करू शकतो, या न्यायाने ते तेज धारण केलेल्या सप्त कृत्तिका याच केवळ त्या भगवान शिव यांचे तेज धारण करू शकल्या आणि कार्तिक स्वामी यांच्या माता झाल्या. त्यांनी त्याचे पालन पोषण केले. त्या सातपैकी आकाशात आता केवळ सहाच दिसतात. परंतु तो खगोलाचा भाग असल्यामुळे त्याचे विश्लेषण येथे करणे योग्य नाही. मुळात या संपूर्ण पुराणकथेचा गुढार्थच वेगळा असतो. शब्दार्थाने ती कथा जशीच्या तशी कधी घडली असेल असा घेणे योग्य नाही. जगभरात अनेक धर्मांत आणि संस्कृतींत कृत्तिका नक्षत्राच्या अनेक वेगवेगळ्या कथा आहेत.
श्री स्वामी समर्थ जो श्लोक म्हणायचे त्याचा अर्थ इतका स्थूल नाही. धनाढ्य या शब्दाचा स्थूल स्वरूपात विचार केला तर सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने पैसा, संपत्ती हेच त्याच्यासाठी धन असते. पण आध्यात्मिक दृष्टीने धनाचा अर्थ हा वेगळा आहे.
इथे धनाचा अर्थ आहे जीवाने त्याचे ' ध ' बीज शुद्ध करणे. ' ध ' बीज शुद्ध करणे म्हणजेच त्याची स्वतःची धारणा शक्ती वाढवणे. कारण जीव शुद्ध ' ध ' बीजानेच ' न '



' निर्गुणाशी जोडून घेऊ शकतो आणि जीव खऱ्या अर्थाने धनाढ्य होतो. अशा अर्थाने जेव्हा तो धनाढ्य होतो त्या वेळेला तो वेदशास्त्र पारंगत होतो. याचाच अर्थ असा, की त्याच्या हातून जी जी कृती होते ती वेदप्रामाण्य असते.
वेद पारंगत होणे याचा स्थूल अर्थ जरी वेदांचे पठण करणे, ते स्मृतीत ठेवणे आणि त्याचा उद्‌घोष करणे हे असले, तरी आध्यात्मिक दृष्टीने वेद पारंगत होणे म्हणजेच धारणा शक्ती इतकी उंचावणे की निर्गुणाशी जोडल्यानंतर जीवाचे हातून जी काही कृती होते ती वेदप्रामाण्य असते. धारणा शक्ती आणि स्मृती दोन्ही वेगळे आहे. स्मृती उत्तम असली म्हणजे धारणाशक्ती उत्तम असतेच असे नाही. या सप्तकृत्तीकांचा संबंध देहातील सात चक्रांशी सुद्धा आहे. त्यामुळे जीवाने सात ही चक्र पार करणे याच्याशीही त्या साधनेचा संबंध आहे. कार्तिक स्वामींचा संबंध हा सहा पाकळ्यांच्या स्वाधिष्ठान चक्राशी आहे. ती तेथील देवता आहे. त्यामुळे ' स्व 'चे अधिष्ठान जर पक्के असेल तरच सात चक्रांचा तो टप्पा पार होऊ शकतो. परंतु ' स्व 'चे अधिष्ठान पक्के होण्यासाठी जी कार्तिकेयाची साधना करायची आहे त्या अगोदर मुलाधारी असलेल्या गणेशाची साधना महत्त्वाची आहे. कारण मुलाधार पक्का असेल तरच पुढचा प्रवास शक्य आहे. पण मुलाधार पक्के होणे आणि ' स्व 'चे अधिष्ठान पक्के होणे दोन्ही एकच आहे. बिल्कूल वेगळे नाही.
' ध ' बीज शुद्ध करणे इतके सोपे नाही. ती जन्मोजन्मीची साधना आहे. त्यामुळे ती गुरुकृपेनेच होऊ शकते म्हणून कार्तिक स्वामींनाच जर गुरू केले तर ' ध ' बीज लवकरात लवकर शुद्ध होईल किंवा तुमचा गुरू हाच कार्तिक स्वामी असतो हे जाणले, की मग मूर्तीच्या दर्शनाची गरज असतेच असे नाही.
श्री स्वामी समर्थांच्या बखरीमध्ये श्री रामशास्त्री या त्यांच्या शिष्याचे उदाहरण आहे. अक्कलकोटातील काही मंडळी कार्तिक पौर्णिमेनिमित्त कार्तिक स्वामींच्या दर्शनासाठी निघतात. श्रीराम शास्त्री समर्थांचे सेवेकरी. पण समर्थ त्यांना जाण्याची परवानगी देत नाहीत. राम शास्त्र्यांना वाईट वाटते. परंतु कार्तिक पौर्णिमेदिवशी श्री स्वामी समर्थ रामशास्त्र्यांना साक्षात कार्तिक स्वामींच्या रूपात दर्शन देतात. त्यावेळेला राम शास्त्र्यांना श्री स्वामी समर्थांनी आपल्याला कार्तिक स्वामींच्या मंदिरात मुर्तीच्या दर्शनाला का पाठवले नाही हे उमगते. सद्‌गुरू त्यांच्या अंतरंगी शिष्यांना वेगळ्याच प्रकारे अनुभूती देतात. त्यांच्यासाठी नियमही वेगळेच असतात. म्हणून श्री स्वामी समर्थ हयात असताना म्हणायचे आणि आजही ते म्हणतात, की माझे अंतरंगीचे जे शिष्य आहेत, तेच खऱ्या अर्थाने या विश्वात सर्वात धनाढ्य आहेत.
आपले मराठी महिने जे आहेत ते पूर्वसुरींनी विशिष्ट नक्षत्री होणाऱ्या पौर्णिमेवरून त्यांना नावे दिलेली आहेत, अशी मान्यता आहे. परंतु कालांतराने अनेक वेळा खगोलीय घटना या तशा अनुभवायला येतीलच असे नाही. तसेच याबाबतीतही होते. अनेक वेळेला कार्तिक पौर्णिमा संपल्यानंतर प्रतिपदेला कृत्तिका नक्षत्र येते. त्यामुळे कार्तिक पौर्णिमेलाच कार्तिक स्वामींचे कृत्तिका नक्षत्री दर्शन घ्यावे असे नाही. तर कार्तिक मासातील कोणत्याही दिवशी येणाऱ्या कृत्तिका नक्षत्राला दर्शन घेऊ शकता. पण आपण दर्शन का घेतो..? याची जाण मात्र आपल्या मनामध्ये पूर्णपणे हवी.
शिवाच्या तेजाने धारण केलेले कार्तिक स्वामींचे जे रूप आहे, त्याची आराधना ही सोपी नाही हे जाणूनच आपल्या ऋषींनी सर्वसामान्य स्त्रीयांना ही साधना न करण्याचे बंधन घातले असावे. परंतू कालपरत्वे साधनेची गोष्ट ही दर्शनापर्यंत जाऊन स्त्रियांनी कार्तिक स्वामींचे दर्शन घेऊ नये इथपर्यंत ती रूढ झाली असावी. शिवाचे तेज गंगेलाही धारण करणे शक्य झाले नाही, म्हणून ते नंतर अग्नी तत्त्वाच्या कृत्तिकांनी धारण केले. सर्वसामान्य स्त्री असो नाहीतर पुरुष असो, सर्व जलतत्त्वाने, पृथ्वीतत्वाने भरलेले आणि त्याच्या प्रभावाने भारलेले असतात. त्यामुळे जे गंगेलाही शक्य झाले नाही ते सर्वसामान्य जीवाला शक्य होणार नाही, या न्यायाने ते बंधन घातले असावे. परंतु येथे स्त्री या शब्दाचा अर्थ लिंगाने स्त्री नाही तर जलतत्त्वाच्या प्रभावाखाली असलेला प्रत्येक जीव, जो सर्वसामान्य आहे.
सर्वसामान्य याचा अर्थ चेतनेच्या स्तरावर अंतरंगातून सर्वसामान्य. मग तो पुरुष असो नाहीतर स्त्री असो, त्यासाठी हा नियम घातला असावा.
परंतु पुरुषप्रधान संस्कृतीने हा नियम फक्त स्त्रियांनाच लावलेला असू शकतो. अन्यथा केवळ मूर्तीचे दर्शन स्त्रियांनी अथवा पुरुषांनी घेण्यास कुठलेही बंधन नाही. आणि त्याचा कुठलाही विपरीत परिणामही नाही. म्हणून कार्तिक महिन्यामध्ये कार्तिक पौर्णिमेला कृत्तिका नक्षत्र असो वा नसो, ज्यांना कार्तिक स्वामींचे दर्शन घेण्याची इच्छा आहे ते त्या महिन्यातील कुठल्याही तिथीला येणाऱ्या कृत्तिका नक्षत्री दर्शन घेऊ शकतात. फक्त त्याच महिन्याच्या नाहीतर प्रत्येक महिन्याच्या कृत्तिका नक्षत्री दर्शन घेऊ शकतात. जर कार्तिक स्वामींची आराधना करायची असेल तर रोजही घेऊ शकतात. फक्त महत्त्वाचा भाग इतकाच आहे, की ते दर्शन आपण का घेत आहोत? याची जाण जीवाला मनामध्ये असणे अतिशय गरजेचे आहे. कार्तिक स्वामींची मंदिरेही अतिशय कमी असल्याने अनेकांना प्रश्न पडतो. त्यामुळे त्याचा एक मूलभूत भाग तुम्हाला मी सांगतो. जर तुम्हाला कार्तिक महिन्यातील कृत्तिका नक्षत्री कार्तिक स्वामींचे मंदिर मिळत नसेल, तर तुम्ही तुम्हाला आवडणाऱ्या कुठल्याही देवतेच्या मंदिरात अथवा सद्‌गुरूंच्या मंदिरात जा आणि तेथे दर्शन घ्या. म्हणजे तुम्ही श्रद्धायुक्त अंतःकरणाने मनोभावे केलेला नमस्कार श्री कार्तिक स्वामीपर्यंत नक्की पोहोचेल, याची खात्री बाळगा.

# देव दिवाळीला नेमकी कोणत्या देव-देवतांची पूजा करावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेच्या तिथीला देव दिवाळी साजरी केली जाते. देव दिवाळीचे पर्व खूपच खास असते. आख्यायिकेनुसार कार्तिक पौर्णिमेला सर्व देवी-देवता शिवनगरी असलेल्या काशीमध्ये गंगेच्या काठावर येतात, अशी मान्यता आहे. गंगेत स्नान केल्यानंतर ते भगवान शिव यांची पूजा करतात आणि दिवे लावण्याची परंपरा आहे. दरवर्षी कार्तिक पौर्णिमेस प्रदोष काळात काशीमध्ये गंगेच्या काठावर दिवे लावण्याची परंपरा आजही आहे. गंगा किनाऱ्यासह देशभरात सर्वत्र देव दिवाळी साजरी केली जाते. या दिवशी गंगेत स्नान करतात. शंकराची पूजा करतात आणि दिवे लावतात. त्यामुळे सर्व दुःख, आजार यापासून मुक्तता मिळते.



### देव दिवाळीला कोणत्या देव-देवतांची पूजा केली जाते?

हा दिवस देवतांच्या दिवाळीच्या रूपात साजरा केला जातो. पण तुम्हाला माहीत आहे का की देव दिवाळीला नेमकी कोणत्या देवांची पूजा केली जाते? पौराणिक कथांनुसार कार्तिक पौर्णिमेस सर्व देव-देवता भगवान शंकर यांच्या नगरात गंगा घाटावर येतात. गंगेत स्नान केल्यानंतर भगवान शंकर यांची पूजा करतात आणि दिवे लावतात.

### त्रिपुरारी पौर्णिमा

या दिवसाला शास्त्रांमध्ये त्रिपुरारी पौर्णिमा असेही म्हटले जाते. कारण या दिवशी भगवान विष्णूंसह महादेव यांचीही पूजा केली जाते.

### महाकार्तिक

या सणाचे महत्त्व आणखी वाढते. जेव्हा तो कृत्तिका नक्षत्रात येतो. त्यामुळेच याला महाकार्तिक असेही म्हटले जाते. देव दिवाळीचा शुभ मुहूर्त ५ नोव्हेंबर २०२५ रोजी ब्रह्म मुहूर्त पहाटे ४.५२ ते ५.४४ वाजेपर्यंत असणार आहे. त्या दिवशी अभिजीत मुहूर्त नसेल. या दिवशी प्रदोष काळात दिवे लावले जातात. दिवे लावण्याचा शुभ काळ ५.१५ ते ७.५० वाजेपर्यंत असून, त्या दिवशी देव दिवाळीचा शुभ काळ २ तास ३५ मिनिटे असणार आहे. देव दिवाळीला नदीकाठावर ११,२१,५१ किंवा १०८ दिवे लावावेत.

### देव दिवाळीचे महत्त्व

पौराणिक कथेनुसार त्रिपुरासूर नावाच्या राक्षसाचा अत्याचार तिन्ही लोकांमध्ये वाढला होता. देव, देवी आणि मानव सर्वजण दुःखी झाले होते. त्यानंतर भगवान शंकर यांनी त्रिपुरासूर याचा नाश केला आणि तिन्ही लोकांमध्ये आनंद निर्माण झाला. त्या दिवशी काशीमध्ये गंगेच्या काठावर देव-देवता एकत्र आल्या. त्यांनी गंगेत स्नान केले. प्रदोष काळात शंकराची पूजा केली आणि दिवे लावले. आज-काल, काशी, प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि इतर धार्मिक स्थळांवर दिवे लावून देव दिवाळी साजरी केली जाते.

### जळगावहून विमानांचे उड्डाण सकाळीच व्हावे....!

**परन १ वरून :** किंवा हैदराबादला दिवसाच्या पहिल्या सत्रात पोहोचता येईल. प्रवाशांचे दिवसाचे नियोजन अधिक कार्यक्षम होईल. सकाळच्या वेळी नव्याने फ्लाईट्स सुरू झाल्याने पर्यटन विकासाला चालना तर मिळेल. शिवाय जळगाव विमानतळाच्या वापरात वाढ होईल. दरम्यान, आठवड्यातून फक्त चार दिवस सुरू असणारी जळगाव- मुंबई विमानसेवा २६ ऑक्टोबरपासून दररोज सुरू झाली आहे. तर दोन महिन्यांपासून बंद असलेली जळगाव- अहमदाबाद विमानसेवा देखील पूर्ववत झाली आहे. दिवाळीच्या काळात विशेषतः अहमदाबाद विमानसेवा सुरळीत झाल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला. उडान योजनेंतर्गत जळगाव विमानतळावरून गोवासह पुणे, हैदराबाद, मुंबई आणि अहमदाबाद या शहरांसाठी सध्या विमानसेवा सुरू आहे.




# भगवान विष्णूंना ' नारायण' आणि ' हरी ' का म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात भगवान विष्णूंची पूजा सर्वाधिक केली जाते. कोणी त्यांना भगवान विष्णू रूपात, तर कोणी भगवाव श्रीकृष्ण किंवा प्रभू श्रीरामचंद्रांच्या रूपात पूजतात. धर्माचे रक्षण करण्यासाठी भगवान विष्णूंनी विविध युगांत अनेक अवतार घेतले आणि पृथ्वीवरील पापांचा नाश केला. वेदव्यासांनी रचलेल्या भविष्यपुराणात सांगितले आहे, की कलियुगात विष्णू कल्की अवतार घेतील.

**विष्णूंची ' हरी ' आणि ' नारायण ' ही नावे**

पालनकर्ता भगवान विष्णूंचे महान भक्त नारद मुनी त्यांना सदैव ' नारायण ' या नावाने संबोधतात. त्यांना अनंतनारायण, सत्यनारायण, लक्ष्मीनारायण, शेषनारायण अशा अनेक नावांनी ओळखले जाते. पण या सर्व नावांमध्ये ' नारायण ' हे नाव कायम जोडलेले आहे.

**विष्णूंना ' नारायण ' का म्हणतात?**

पुराणकथेनुसार जलदेवता वरुण यांचा जन्म भगवान विष्णूंच्या पायांतून झाला.



तसेच देवगंगा नदीही विष्णूंच्या पायांतून उत्पन्न झाली. जिला विष्णूपदोदकी असे म्हणतात. भगवान विष्णूंचे निवासस्थान समुद्र आहे. ' जल ' याला दुसरे नाव ' नीर ' किंवा ' नार ' आहे आणि निवासाला ' आयन ' म्हणतात. त्यामुळे नार + आयन म्हणजे नारायण जलात वास करणारे देव.

**विष्णूंना ' हरी' का म्हणतात?**

' हरी ' या शब्दाचा अर्थ आहे जो मन हरतो किंवा पापांचा नाश करतो. शास्त्रांनुसार ' हरी हरति पापानि ' म्हणजेच भगवान विष्णू पापांचा नाश करतात. त्यांना अत्यंत प्रिय तिथी एकादशी आहे. या दिवशी उपवास केल्यास मनुष्याचे जन्मोजन्मीचे पाप नष्ट होतात आणि त्याला सर्व सुखांची प्राप्ती होते. अशा प्रकारे भगवान विष्णूंना ' नारायण ' आणि ' हरी ' या दोन्ही नावांनी ओळखले जाते. एक त्यांच्या जलनिवासाचे प्रतीक आहे आणि दुसरे त्यांच्या पापनाशक स्वरूपाचे.




# आज वैकुंठ चतुर्दशी; हरिहर भेट

## मध्यरात्री श्रीविष्णू पूजन नक्की करूया

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चातुर्मासात भगवान विष्णू शेषावर झोपी जातात तेव्हा त्या काळात विश्वाचा कारभार भगवान शंकर यांच्याकडे असतो. वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशी भगवान शंकर भगवान विष्णूंकडे येऊन त्यांच्याकडे कारभार सोपवितात. त्यानंतर स्वतः कैलास पर्वतावर तपस्येसाठी जातात, असे म्हटले जाते. या दिवशी ' हरिहर भेट ' म्हणजे भगवान विष्णू आणि भगवान शंकर यांची भेट होते.

या दिवशी रात्री भगवान शंकर यांची १००८ नावे घेऊन आणि विष्णूची सहस्र नावे घेऊन बेल आणि तुळस वाहून पूजा केली जाते. या दिवशी विष्णूंची सहस्त्र कमळांनी पूजा करणाऱ्याला कुटुंबाला वैकुंठ प्राप्ती होते, असे म्हणतात.



महाभारत काळात भगवान श्रीकृष्ण यांनी युद्धात ज्यांचा मृत्यू झाला होता त्यांचे श्राद्ध वैकुंठ चतुदर्शीला केले होते. म्हणूनच या दिवशी तर्पण आणि श्राद्ध करणे श्रेष्ठ असल्याचे मानले जाते. सद्गुणी, दिव्य पुरुष आणि सतकर्म करणाऱ्यांना वैकुंठ प्राप्ती होते. तरी श्रद्धापूर्वक वैकुंठ चतुर्दशी केल्यास वैकुंठात स्थान मिळण्याची शक्यता वाढते.

### वैकुंठ चतुर्दशीचे महत्त्व

पौराणिक कथेनुसार एकदा भगवान विष्णू यांनी काशी येथे भगवान महादेव यांना एक हजार कमळ वाहण्याचा संकल्प केला होता. यावेळी भगवान महादेव यांनी भगवान विष्णूंची परीक्षा घेण्यासाठी या कमळातून एक कमळ कमी केले. यावर भगवान विष्णू यांनी आपले कमळासारखे डोळे अर्पण करण्याचा निर्धार केला. भगवान विष्णू यांची ही भक्ती पाहून भगवान महादेव प्रसन्न झाले आणि त्यांनी विष्णूला वर दिला, की कार्तिक मासात येणारी चतुर्दशी ' वैकुंठ चतुर्दशी ' म्हणून ओळखली जाईल. जो कोणी हे व्रत करील त्याला वैकुंठ प्राप्ती होईल.

या दिवशी भगवान विष्णू यांची पूजा केली जाते. भगवान विष्णू यांना चंदन, फुले, दूध, दही या सर्वांनी अंघोळ घातली जाते आणि भगवान विष्णू यांचा अभिषेक केला जातो. या दिवशी भगवान विष्णू नामस्मरण केले जाते. भगवान विष्णूंना गोड नैवेद्य दाखविला जातो आणि त्यानंतर उपवास सोडला जातो. तसेच या दिवशी विष्णूंसह भगवान शिव यांची पूजा केल्याने सर्व पापांपासून मुक्ती मिळते. पुराणानुसार या दिवशी भगवान शिव यांनी प्रभू विष्णूंना सुदर्शन चक्र दिले होते. या दिवशी शिव-विष्णू एका एक रूपात असतात. कार्तिक शुक्ल चतुर्दशी ही तिथी वैकुंठ चतुर्दशी या नावेही ओळखली जाते. असे म्हणतात, की या तिथीला ब्रह्ममुहूर्तावर भगवान महाविष्णूंनी वाराणसीच्या मणिकर्णिका घाटावर स्नान केले होते आणि भगवान शंकरांची प्रार्थना केली होती. त्या पूजेने भोलेनाथ एवढे प्रसन्न झाले, की त्यांनी प्रत्यक्ष हरीची भेट घेतली आणि प्रसन्न होऊन वर दिला, की यादिवशी जे विष्णू भक्त किंवा शिव भक्त मनोभावे भगवंताची आळवणी करतील, त्यांना वैकुंठप्राप्त होईल. मृत्यूनंतर नरकात जावे, असे कोणाला वाटेल? आयुष्यभर हालअपेष्टा सहन केल्यानंतर मृत्यूपश्चात तरी आत्म्याला सद्गती मिळावी, असे प्रत्येकाला वाटते. ती वाट सुकर व्हावी, म्हणून आपण आयुष्यभर चांगले आचरण करतो आणि त्याला आध्यात्मिक जोड मिळावी, म्हणून व्रत-वैकल्य करतो. वैकुंठ चतुर्दशीचे व्रत ही त्यापैकीच एक. वैकुंठ चतुर्दशीलाच काशी विश्वनाथ स्थापना दिवस असेही म्हणतात.

या दिवशी भगवान विष्णू आणि महादेव यांची प्रार्थना केली जाते व षोडशोपचार पूजा करून स्तोत्रपठण केले जाते. आषाढी एकादशीला भगवान महाविष्णू झोपतात, ते थेट कार्तिकी एकादशीला उठतात, असे म्हटले जाते. विष्णूंच्या अनुपस्थितीत त्यांची वैश्विक जबाबदारी भगवान शंकर सांभाळतात. याबद्दल कृतज्ञता म्हणून विष्णू महादेवाला फळे, फुले आणि बेल वाहतात, तर महादेवदेखील विष्णूंना प्रिय असलेली तुळशी वाहून जागे करतात. हे हरी हर ऐक्य, प्रेम, सद्भावना, एकमेकांप्रती आदर या भेटीतून दिसून येतो. तो आदर्श आपणही डोळ्यासमोर ठेवून आपण दोहोंची उपासना करावी, हा वैकुंठ चर्तुदशी मागील हेतू आहे. वैकुंठ चतुर्दशीला सकाळी स्नान करून हरी-हर स्तोत्र म्हणतात. अन्यथा विष्णूंची सहस्र नावे घेऊन बेल आणि महादेवांना रुद्र म्हणत तुळशीची पाने अर्पण केली जातात. इतर वेळी शंकराला बेल आणि विष्णूंना तुळस वाहतो, परंतु या भेटीचे आगळेवेगळे महत्त्व म्हणून अशी पूजा केली जाते.

## श्री हरी-हर भेट पूजन

वैकुंठ चतुर्दशी हे व्रत सनत्कुमार संहितेमधील ' कार्तिक महात्म्यात ' आलेले आहे. सनत्कुमार संहितेप्रमाणे उपवास (मंगळवार, दि. ४ मंगळवार रोजी करावा) कारण हेमलंब नामक संवत्सरी कार्तिकी शु. चतुर्दशी दिवशी प्रत्यक्ष भगवान विष्णूंनीच काशीच्या मणिमर्णिका घाटावर स्नान करून १००० कमळपुष्पांनी भगवान शिवांचे पूजन केले होते. ज्यांना उपवास करायचा असेल त्यांनी (मंगळवारी) सकाळी प्रातःस्नान करून दिवसभर उपवास करावा व सर्वांनीच रात्री ११.३९ ते १२.३२ या वेळेत १०८ शिवनामावली म्हणत - भगवान विष्णूंच्या प्रतिमेला/विग्रहावर १०८ बेल पत्र अर्पण करून पूजा करावी व बुधवारी सकाळी ६ वाजता भगवान विष्णूंची १००० नामावली म्हणत १००० तुळशी पत्र भगवान शिवांच्या पिंडीवर अर्पण करून पूजा करावी. वर्षभरातील याच तिथीला भगवान शिवांना तुळशी पत्र अर्पण केले जाते. जे इतर वेळी केले जात नाही. वैकुंठ चतुर्दशी पूजनासाठी मंगळवारी रात्री वरीलप्रमाणे भगवान विष्णूंची सेवा करायची आहे आणि बुधवार, दि. ५ - सकाळी ६ वाजता भगवान शिवांच्या पिंडीवर भगवान विष्णूंच्या (श्रीविष्णूसहस्र नामावलीने)१००० नामावली म्हणत १००० /१०८/११ तुळशी पत्र अर्पण करावे.

देवाधिदेव महादेवांना प्रसन्न केले असता, आपसुक माता पार्वतीदेखील प्रसन्न होते आणि भगवान विष्णूंचे ध्यान केले असता, त्यांच्यासह लक्ष्मी मातेचीही कृपादृष्टी लाभते. त्यामुळे घरातील दुःख, दारिद्र्य नाहीसे होऊन आयुष्यातील नरक यातना मिटतात आणि जीवंतपणीच वैकुंठप्राप्तीचा आनंद अनुभवता येतो.

स्वर्ग म्हणजे तरी नेमके काय? स्व म्हणजे स्वतः आणि ग म्हणजे सभोवतालचा परिसर. आपण निर्माण केलेले विश्व आणि आपल्या विश्वातील आनंददायी क्षण म्हणजे स्वर्ग. तसेच नरक म्हणजे नराने निर्माण केलेला तो नरक. वाईट गोष्टी पेरल्या तर फळही वाईटच येते. निसर्गाने आपल्याला भरभरून दिले परंतु मानवाने आपल्या हातांनी बरेच काही गमावले. त्यामुळे जी स्थिती निर्माण झाली तो नरक. मनुष्यासमोर चांगला आदर्श, चांगले विचार, चांगले आचार असले, की तो ठरवूनही मनात वाईट विचार आणू शकत नाही. यासाठीच चांगल्या कथा कहाण्यांचे पारायण केले जाते. त्यातून प्रेरणा घेतली जाते. आपण आपले क्षुल्लक काम दुसऱ्याच्या अंगावर ढकलून मोकळे होतो. येथे तर चार महिन्यांचा ओव्हर टाईम करूनही भगवान महादेवांनी कुठलीही तक्रार केली नाही. आहे ना कौतुकास्पद?



## वैकुंठ चतुर्दशी : विष्णू-शिव भेटीचा अलौकिक दिवस

वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशी भगवान विष्णू आणि भगवान शिव यांची हरिहर भेट होते. हा प्रसंग अत्यंत पवित्र आणि दुर्मिळ योग मानला जातो. वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशी भगवान विष्णू-भगवान शिव यांची एकत्रित पूजा केल्याने आणि व्रत केल्याने भक्ताला थेट वैकुंठ धामाची प्राप्ती होते, अशी लोकांची श्रद्धा आहे.

### वैकुंठ चतुर्दशी २०२५ ची तारीख

यंदा २०२५ मध्ये वैकुंठ चतुर्दशी मंगळवार, ४ नोव्हेंबर रोजी साजरी केली जाईल.

**चतुर्दशी तिथी प्रारंभ :** पहाटे ०२:०५ वाजता.

**चतुर्दशी तिथी समाप्ती :** रात्री १०: ३६ वाजता.

निशीथ काळ (विष्णू पूजेचा शुभ मुहूर्त) ४ नोव्हेंबरच्या मध्यरात्री ११.५८ ते ५ नोव्हेंबरच्या मध्यरात्री १२: ४९ वाजेपर्यंत

### वैकुंठ चतुर्दशीचे महत्त्व आणि हरिहर भेट

वैकुंठ चतुर्दशी म्हणजे भगवान विष्णू-भगवान शिव यांच्या भेटीचा अलौकिक दिवस. चातुर्मासाचे (चार महिने आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन) काळात विश्वाचा कारभार भगवान शंकर यांच्याकडे असतो. वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशी भगवान शंकर हे भगवान विष्णू यांच्याकडे विश्वाचा कारभार पुन्हा सोपवितात आणि स्वतः कैलास पर्वतावर तपस्येसाठी जातात. याच दिवशी ' हरिहर भेट ' म्हणजेच विष्णू आणि शंकराची भेट होते. म्हणून हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. या दिवशी भगवान विष्णू यांची मध्यरात्री (निशीथ काळात) आणि भगवान शंकर यांची सकाळच्या ब्रह्ममुहूर्तावर पूजा करण्याची परंपरा आहे. अनेक ठिकाणी वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशी भगवान विष्णूंना बेलप्रत्र आणि भगवान शिव शंकराला तुळस अर्पण करतात.

### वैकुंठ चतुर्दशीची पौराणिक कथा

वैकुंठ चतुर्दशी म्हणजे विष्णू-शिव भेटीचा अलौकिक दिवस. एका पौराणिक कथेनुसार एकदा भगवान विष्णू यांनी काशी येथे महादेवाची पूजा करण्याचा संकल्प केला. त्यांनी १०८ कमळ फुले शिवलिंगाला अर्पण करण्याचा निश्चय केला. भगवान शंकर यांनी त्यांची भक्ती तपासण्यासाठी त्या कमळातून एक कमळ कमी केले.

एक कमळ कमी पडत असल्याचे पाहून विष्णूंनी विचार केला, की लोक मला ' कमलनयन ' किंवा ' पुंडरीकाक्ष ' (कमळासारखे डोळे असलेला) म्हणतात. मग त्यांनी पूजा पूर्ण करण्यासाठी आपला कमळासारखा एक डोळा काढून शिवलिंगावर अर्पण करण्याची तयारी केली.

वैकुंठ चतुर्दशी म्हणजे विष्णू-शिव भेटीचा अलौकिक दिवस. भगवान विष्णूंची ही अगाध भक्ती पाहून भगवान शिव अत्यंत प्रसन्न झाले. ते तत्काळ प्रकट झाले आणि विष्णूंना थांबविले. त्यांनी विष्णूंना वर दिला, की कार्तिक शुक्ल चतुर्दशी हा दिवस यापुढे ' वैकुंठ चतुर्दशी ' म्हणून ओळखला जाईल. जो कोणी या दिवशी हे व्रत करेल आणि प्रथम विष्णूची व नंतर शिवाची पूजा करेल. त्याला जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्ती मिळेल आणि थेट वैकुंठ धामाची प्राप्ती होईल. त्याच दिवशी शिवाने विष्णूंना सुदर्शन चक्र देखील प्रदान केले.

### पैसा स्थिर ठेवण्याकरिता आणि घरात बरकत आणण्यासाठीचे उपाय

वैकुंठ चतुर्दशी पूजा विधी

या दिवशी हरिहर भेटीमुळे पूजेत एक आगळेवेगळे महत्त्व असते.

१) भगवान श्री विष्णूची पूजा (मध्यरात्री, निशीथ काळ)

पहाटे स्नान करून स्वच्छ पिवळी वस्त्रे परिधान करावीत.

लागडी आसनावर पिवळे कापड पसरवून भगवान विष्णूंची मूर्ती किंवा चित्र स्थापित करावे.

कमळ फुले, चंदन, केशर, दूध, दही, साखर, मध आणि गोड नैवेद्य अर्पण करावा.

या दिवशी भगवान विष्णूंना बेलपत्र (बेल) अर्पण केले जाते, जे इतर वेळी शंकराला वाहतात.

' विष्णू सहस्रनाम ' किंवा ' **ॐ नमो भगवते वासुदेवाय** ' या मंत्राचा जप करावा.

माखणा खीरचा नैवेद्य अर्पण करावा.

२) भगवान शंकराची पूजा (सकाळ/ब्रह्म मुहूर्त)

दुसऱ्या दिवशी सकाळी भगवान शिव यांची पूजा करावी.

शिवलिंगावर गायीचे दूध, दही आणि मधाचा अभिषेक करावा.

बिल्वपत्र, धतुरा, भांग, फळे आणि मिठाई अर्पण करावी.

या दिवशी भगवान शंकर यांना तुळशीची पाने अर्पण केली जातात, जी इतर वेळी भगवान विष्णूंना वाहतात. (हरिहर भेटीचे प्रतीक म्हणून हे केले जाते).

' रुद्राष्टकम ', ' शिवमहिम्ना स्तोत्र ' किंवा ' ॐ नमः शिवाय ' या मंत्राचा जप करावा.

### वैकुंठ चतुर्दशी व्रताचे फल

वैकुंठ चतुर्दशी म्हणजे भगवान विष्णू-भगवान शिव यांच्या भेटीचा अलौकिक दिवस. या पवित्र दिवशी विष्णू आणि शिव या दोन्ही देवांची एकत्रित पूजा केल्याने भक्तांचे सर्व पाप नष्ट होतात. घरात सुख-शांती येते, दुःख-दारिद्र्य दूर होते आणि मनुष्याला त्याच्या जीवनातच वैकुंठ प्राप्तीचा आनंद मिळतो, असे मानले जाते. या व्रतामुळे आरोग्य चांगले राहते आणि मृत्यूनंतर मोक्ष प्राप्त होतो.

# तुळशी विवाह : विष्णूचा तुळशीशी विवाह लावण्याचा पूजोत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कार्तिक शुद्ध एकादशीपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत तुळशी विवाह करण्याचा प्रघात आहे. कार्तिक शुक्ल एकादशी ते पौर्णिमा असे पाच दिवस ही दिवाळी असते. या दिवशी भगवान विष्णू झोपेतून जागे होतात आणि चातुर्मास संपतो. भगवान विष्णू यांच्या या जागृतीचा जो उत्सव करतात त्याला प्रबोध उत्सव असे म्हणतात. हा उत्सव आणि तुळशी विवाह हे दोन्ही उत्सव एकतंत्राने करण्याची रूढी आहे.



### विवाहासाठी सजविलेला बाळकृष्ण

तुळशी विवाह म्हणजे तुळशी (पवित्र तुळस) वनस्पतीच्या रोपाचे शाळीग्राम किंवा भगवाव विष्णू किंवा त्यांचे अवतार श्रीकृष्ण यांच्याशी विवाह प्रबोधिनी एकादशीपासून करण्याची पूजोत्सव प्रथा आहे. भगवान विष्णू कार्तिक महिन्यातील देवउठणी एकादशीला संपूर्ण चार महिने झोपल्यानंतर उठतात. तेव्हा तुळशीशी लग्न लावतात. भगवान विष्णू यांना तुळशी खूप प्रिय आहेत. तुळस ही माता लक्ष्मीचे स्वरूप मानली जाते. हिंदू धर्मात तुळशीला पापनाशिनी म्हणून अनन्यसाधारण महत्त्व आहे. तुळस ही भारताच्या सर्व प्रांतांत व सर्व भागांत उगवणारी वनस्पती आहे. बहुतेक हिंदू कुटुंबांच्या घरामागे अंगणात तुळशी वृंदावन असते. विष्णूचा तुळशीशी विवाह लावण्याचा पूजोत्सव कार्तिक द्वादशीपासून पौणिमेपर्यंत एखाद्या दिवशी सायंकाळी करतात. पण मुख्यत्वे द्वादशीलाच करतात. तुळशी विवाह हे एक व्रत मानले गेले आहे. हे व्रत केल्याने कर्त्याला कन्यादानाचे फळ मिळते, असे मानले जाते.घरातीलच कन्या मानून घरातील तुळशी वृंदावनाची- तुळशीचे रोप असलेल्या कुंडीची- गेरू व चुन्याने रंगरंगोटी करतात, सजवितात. त्यावर बोर, चिंच, आवळा, कृष्णदेव सावळा असे लिहितात. बोर, चिंच, आवळा, सीताफळ, कांद्याची पात त्यात ठेवतात. कुटुंबातील कर्ता माणूस स्नान करून तुळशीची आणि कृष्णाची पूजा करतो. नंतर त्यांना हळद व तेल लावून मंगल स्नान घालतो. तुळशीला नवीन वस्त्र पांघरतात व त्यावर मांडव म्हणून उसाची वा धांड्याची खोपटी ठेवतात. पूजेचे उपचार समर्पण करून भगवान विष्णू यांना जागे करतात. त्यानंतर बाळकृष्ण व तुळस या दोघांमध्ये अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणून त्यांचा विवाह लावला जातो. कर्त्याने यानंतर तुळशीचे कन्यादान करावे व नंतर मंत्रपुष्प आणि आरती करावी, असा संकेत आहे. घरच्या कन्येस श्रीकृष्णांसारखा आदर्श वर मिळावा, असा त्यामागील हेतू आहे. या विधीवेळी तुळशीभोवती दीप आराधना करण्याची पद्धती आहे.

### तुळशी विवाह कसा करावा?

* तुळशी विवाहाच्या तीन महिने आधीपासून तुळशीच्या रोपाला नियमित पाणी घालून त्याची पूजा करावी.
* मुहूर्तानुसार मंत्रोच्चारण करून दाराला तोरण व मंडप लावावे.
* चार पुरोहितांकरवी गणपती-मातृका पूजन करावे.
* लक्ष्मी-नारायण यांची मूर्ती व तुळशीपत्रासोबत सोने व चांदीची तुळस आसनावर ठेवावी.
* यजमानाने पत्नीसोबत उत्तराभिमुख आसन ग्रहण करावे.
* गोरज मुहूर्तावर (वराचे) देवाचे पूजन करावे.
* मंत्रोच्चारासह कन्येस (तुळशीस) दान करावे.
* हवन व अग्नीभोवती सप्तपदी पूर्ण करावी.
* वस्त्र व आभूषणे घालावीत.
* ब्राह्मण भोजन करवून मग स्वतः अन्न ग्रहण करावे.
* शेवटी मंगलाष्टकांनी विवाह लावावा.

### तुळशीचे महत्त्व

* तुळशी हे दिसायला साधारण रोप असले, तरी भारतीयांसाठी ते पवित्र आहे. * पूजा साहित्यात तुळशीपत्र गरजेचे असते. त्याशिवाय देव प्रसाद ग्रहण करत नाहीत, असे मानले जाते.
* नवमी, दशमीचे व्रत व पूजा करून नंतरच्या दिवशी तुळशीचे रोप ब्राह्मणाला दान करणे अत्यंत शुभ मानले जाते.
* स्नानानंतर रोज तुळशीच्या रोपाला पानी देणे आरोग्यासाठी उत्तम मानले जाते. * तुळशीमुळे तिच्या आसपासच्या वातावरणातील हवा शुध्द होते. * तुळशीपत्रांचा अर्क बऱ्याच आजारांवर रामबाण उपाय ठरतो.

